दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
बीड/महाराष्ट्र शनिवार २० जूले २०२४ आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ वर्ष १ ले अंक ३३८ पाने ४ किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक
मो.न.9422660077

# लाडकी बहीण योजनेसाठी शिंदे सरकारचा आणखी एक मोठा निर्णय

## नंदुरबारमध्ये योजनेपासून 16 हजार महिला वंचित राहण

राज्यात महत्त्वकांक्षी अशी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचे फॉर्म भरण्यासाठी महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळत आहेत. मात्र नंदुरबार जिल्ह्यातील लाडकी बहीण योजनेच्या घोषणेंतर्गत विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या १५०० रुपयांपेक्षा जास्त आर्थिक योजनेचा लाभ घेतलेल्या महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. जिल्ह्यातील सरासरी १६ हजार निराधार योजनेतील महिलाही या लाडकी बहीण योजनेला आता मुकणार आहेत. संजय गांधी योजना, इंदिरा गांधी योजना आणि श्रावण बाळ योजनेअंतर्गत या निराधार महिलांचा समावेश आहे. तर काही महिलांना वयाची अडचण देखील येत असून या महिला लाभापासून वंचित राहणार आहेत.

## परळीमध्ये लाडकी बहीण योजनेचे नोंदणी कॅम्प

बीड जिल्ह्यातील १५ ते २६ जुलै दरम्यान मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे प्रभाग निहाय नोंदणी कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे आणि आमदार पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त या विशेष कॅम्पेनचे आयोजन करण्यात आलेले आहे. या योजनेचा जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत लाभ मिळावा यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने पुढाकार घेण्यात आलेला आहे.

## चंद्रपूरात 39 हजार 367 बहिणींचे महिन्याचे दीड हजार पक्के

राज्यातील महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, त्यांचे आरोग्य आणि पोषण तसेच कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू केली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिला, मुलींना दरमहा १ हजार ५०० रुपये देण्यात येणार आहे. या योजनेचे चंद्रपूर जिल्ह्यात ऑफलाइन आणि ऑनलाइन मिळून ३९ हजार ३६७ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामुळे या महिलांना दरमहा १ हजार ५०० रुपये महिना आता पक्का झाला आहे.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये अर्ज भरताना अनेक अडचणी

छत्रपती संभाजीनगरमध्ये लाडक बहीण योजनेचा अर्ज भरताना अनेक अडचणी येत आहेत. शहरात लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरताना सर्वर डाऊन तर ॲप संथ गतीने सुरू आहे. सर्वर डाऊन झाल्याने अर्ज भरणाऱ्या लाडक्या बहिणी त्रस्त आहेत. नाव नोंदणीसाठी बराच वेळ उभे राहावे लागत आहे. बऱ्याच ठिकाणी महिलांना अर्ज भरण्यासाठी अडचणी येत आहेत.

**वादळवार्ता/मुंबई**

महाराष्ट्र सरकारने राज्यभरात दीड लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील महिलांना दर महिन्याला दीड हजार रुपयांची आर्थिक मदत देणारी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली आहे. या योजनेसाठी राज्यभरात लाखो महिलांकडून अर्ज केले जात आहेत. पण काही ठिकाणी महिलांना अर्ज करताना अडचणी येत आहेत. या योजनेची नीट अंमलबजावणी व्हावी यासाठी सरकारने आता मोठं पाऊल उचललं आहे. सरकार आता लाडकी बहीण योजनेचं काटेकोर पालन व्हावं यासाठी पूर्ण लक्ष केंद्रीत करणार आहे. विशेष म्हणजे राज्य सरकारने लाडकी बहीण योजना राबवण्यासाठी २ समित्या स्थापन केल्या आहेत. ही योजना काटेकोरपणे राबवण्यासाठी सरकारकडून हे पाऊल उचलण्यात आलं आहे. या योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी यासाठी सरकारकडून दोन समित्या स्थापन गठीत करण्यात आल्या आहेत. या समित्या आता अंमलबजावणीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहेत. भंडारा जिल्ह्यात योजनेसाठी



८३ हजार ४६८ अर्ज मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी भंडारा जिल्ह्यात आतापर्यंत ८३ हजार ४६८ ऑफलाईन आणि ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनीषा कुरसुंगे यांनी दिली. जिल्ह्यात विविध ठिकाणी अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. ग्रामीण आणि शहरी भागात अर्ज भरण्यासाठी स्वतंत्र केंद्र स्थापन केले आहेत. आवश्यक कागदपत्रांविषयी महिलांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. कुटुंबाचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असलेल्या पात्र महिलांकडून ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज भरून घेतले जाणार आहेत. त्यांनतर पात्र महिलांच्या बँक खात्यावर जुलैपासून दरमहा दीड हजार रुपये जमा होणार आहेत. अर्ज भरण्यासाठी नारी शक्ती दूत ॲप आहे. अंगणवाडी तसेच सेतू केंद्र तसेच तहसील कार्यालयात येणाऱ्या महिलांना मार्गदर्शन करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा कार्यक्रमाधिकारी मनीषा कुरसुंगे यांनी दिली आहे.

योजनेमुळे अंगणवाडी सेविकांच्या कामकाजात वाढ

नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण भागात सहा वर्षाच्या खालील बालकांना पोषण आहार वाटप, शिक्षणाचे धडे देण्याबरोबरच गरोदर महिलांचे लसीकरण, त्यांना पोषण आहार देणे, गावात आरोग्यविषयक शिबिर असल्यास मदत करणे, आदी कामांचा बोजा अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर असतानाच शासनाने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अर्ज करण्याची जबाबदारी देखील ह्या अंगणवाडी सेविकांना सोपविली आहे. त्यामुळे अंगणवाडी कर्मचारी गोंधळून गेले आहेत. अंगणवाडी सेविकेला १० हजार ५०० रुपये, तर अंगणवाडी मदतनिसाला ५ हजार रुपये मानधन दिले जाते. एवढ्या मानधनात घरखर्च भागविणे कठीण आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेसाठी ५० रुपये व्यतिरिक्त देणार असल्याची घोषणा केली आहे. मात्र ५० रुपये कमी असून मानधन वाढवावे, अशी मागणी अंगणवाडी सेविकांद्वारे करण्यात येत आहे.

## नागपुरात 84 हजार 884 अर्ज

'माझी लाडकी बहिण' योजनेचे नागपुरात ८४ हजार ८८४ अर्ज जमा झाले आहेत. नागपूर महानगरपालिकेने प्रभागनिहाय केलेल्या अर्ज स्वीकृत केंद्राला चांगला प्रतिसाद मिळत आहे. मनपाच्या प्रभागनिहाय अर्ज स्वीकृती केंद्रात सुटीच्या दिवशीही अर्ज स्वीकारले जातात. रक्षाबंधन पर्यंत माझी लाडकी बहीण योजनेचे जुलै आणि ऑगस्टचे पैसे मिळणार आहेत. प्रशासनाकडून जास्तीत जास्त महिलांनी अर्ज भरण्याचं आवाहन केलं जात आहे.

## पालघर जिल्ह्यातील नोंदणी लाखाच्या पार

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना या राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेचा लाभ मिळण्यासाठी पालघर जिल्ह्यातून आतापर्यत १ लाख ११ हजार ७९२ महिलांनी अर्ज नोंदणी केले आहे. जिल्ह्यातील संभाव्य पात्र महिलांची संख्या सुमारे ३ लाखांच्या जवळपास आहे. त्या तुलनेत जिल्ह्यातील जवळपास तब्बल ३७ टक्के महिलांनी अर्ज नोंदणी केली आहे.

## केज विधानसभा मतदार संघातील सहा रस्त्याच्या ४१ किलोमीटर रस्ते कामासाठी ५० कोटींचा निधी मंजूर आ.नामितातांई मुंदडा यांचा पाठपुरावा

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदार संघाच्य आ. नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नांमुळे मतदार संघातील सहा रस्त्यांची दर्जोन्नती करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली असून या रस्त्यांच्या कामासाठी देखभलीसह जवळपास ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून सिमेंट कॉंक्रीटचे दर्जेदार रस्ते करण्यात येणार आहेत. या रस्ते कामासाठी आ. नमिता मुंदडा यांनी पाठपुरावा केला आहे. आ. नमिता मुंदडा यांनी ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देण्यासाठी दळणवळण प्रभावी करण्याच्या हेतूने रस्तेनिर्मिती आणि दुरुस्तीकडे विशेष लक्ष दिले. आ. मुंदडा यांनी शेकडो कोटी रुपयांचा निधी मतदार संघातील रस्त्यांसाठी आणला असून त्यातून शेकडो किलोमीटरचे रस्ते तयार झाले. एवढेच नव्हे मतदार संघातील उर्वरित रस्त्यांच्या कामांसाठी



निधी उपलब्ध करून घेण्यासाठी त्यांचा पाठपुरावा सुरु होता. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातून मतदार संघातील रा.मा. ६४ ते कानडी बदन रस्ता (२.८ किमी) - ३.८८ कोटी रु., रा.मा. ६४ (चिंचोलीमाळी जवळ) ते सारूकवाडी डोका हदगाव लाखा रस्ता (८.५ किमी) - १०.२८ कोटी रु., इजिमा ५४ (चाकरवाडी जवळ) ते दरडवाडी ढाकणवाडी नांदूरघाट रस्ता (११ किमी) - १३.२६ कोटी रु., प्रजिमा १८ (सोनीजवळा जवळ) ते युसुफ वडगाव भालगाव सादोळा बाऊची रस्ता (१३.५ किमी) - १४.५ कोटी रु., प्रजिमा ३९ ते काशिदवाडी रस्ता (२.८ किमी) - ३.४७ कोटी रु., रा.म.मा. ५४८-ड ते सनगाव (२.२ किमी) - २.५८ कोटी रु.. या व्यतिरिक्त रस्ते देखभालीसाठी स्वतंत्रपणे २ कोटी १७ लाखांचा निधी या सहा रस्त्यांची दर्जोन्नती करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्यासोबतच ४१ किलोमीटरच्या या रस्त्यांसाठी सिमेंट कॉंक्रीटीकरणासाठी ४७ कोटी ५७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच या रस्त्यांच्या १० वर्षांच्या देखभालीसाठी स्वतंत्रपणे २ कोटी १७ लाखांचाही निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे लवकरच या रस्त्यांची दुरावस्था संपणार असून नागरिकांना सिमेंट कॉंक्रीटच्या चकचकीत आणि दर्जेदार रस्त्यांवरून सुखकर प्रवास करणे शक्य होणार आहे. हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, लोकनेत्या आ.पंकजाताई मुंडे यांचे आ. मुंदडा यांनी आभार मानले आहे

## विशालगड आणि गजापुर येथे दर्गाह मस्जिद आणि नागरिकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ परळीत मोर्चा

परळी/प्रतिनिधी कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड आणि गजापूर गावात समाजकंटकांनी केलेल्या भ्याड हल्ल्याच्या व हिंसाचार प्रकरणी निषेध व्यक्त करण्यासाठी परळीत सकल मुस्लिम समाजाच्या वतीने उपविभागीय कार्यालयावर भव्य निषेध मोर्चाचे आयोजन आज १९ जुलै २०२४ रोजी करण्यात आले होते

या हल्ल्यात गजापूर येथील मस्तीदीवर आणि मुस्लिम समाजातील अनेक घरांवर केलेल्या हल्ल्याच्या निषेध करण्यात आला. मोर्चा नेहरू चौक, आझाद चौक मार्ग उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यामध्ये मुस्लिम बांधवांनी आपल्या हातावर काळी पट्टी बांधून जाहीर निषेध व्यक्त केला. या निवेदनात प्रमुख मागण्या ... १)सदर घटना पूर्वनियोजित असून वरील गुन्हे करणाऱ्या आरोपींना लवकरात लवकर अटक करून कठोरात कठोर शिक्षा करावी, झालेल्या हिंसाचारात ज्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई द्यावी,जी शेकडो वर्षापासून प्रार्थना स्थळे आहेत त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था शासनाने करावी,मुस्लिम समाजावर कोल्हापुरात व महाराष्ट्रात सतत होणाऱ्या अत्याचाराविरोधात पोलीस अधीक्षक यांच्या द्वारे प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्याक अत्याचार प्रतिबंधक समिती स्थापन करावी व तिची अंमलबजावणी प्रत्येक जिल्ह्यात करावी, सोशल मीडियात मुस्लिम समाजाबद्दल आणि त्यांच्या अस्थेशी जोडलेल्या धार्मिक स्थळाबद्दल व्हिडीओ बनवणाऱ्या आणि धार्मिक भावना दुखवणाऱ्या मंडळीवर कायदेशीर कारवाई करावी या मागण्याचा समावेश आहे.

या मोर्चात कुठलाही अनुचित प्रकार घडू नाही म्हणून पोलिसांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# सांगली शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्रामार्फत दिव्यांगासाठी मोफत संगणकीय व व्यावसाईक प्रशिक्षण

**बीड/प्रतिनिधी**

बीड, दि. 19, : महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत कायरंत शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह ही संस्था प्रौढ दिव्यांगासाठी मोफत प्रशिक्षण देणारी पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव शासकीय संस्था आहे. या संस्थेतील प्रशिक्षण वर्गाना महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई ची शासन मान्यता आहे. या संस्थेला अखिल भारतीय स्तरावरील FICCI AWARD 1999 हा प्राप्त झालेला आहे. सन 2024-25 या चालू शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देणे सुरु आहे. माफक जागा असल्याने त्वरीत संपर्क साधावा असे संस्थेच्या वतीने कळविण्यात आले आहे. प्रवेशासाठी नियम अटी व सवलती. अभ्यासक्रमाचे नांव- अ) सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर ऑपरेशन वुईथ एम.एस. ऑफिस(संगणक कोर्स)- शैक्षणिक पात्रता-किमान इ. ८ वी पास, ब) मोटार ॲन्ड आर्मेचर वायडींग, सबमर्सिबल पंप सिंगल फेज, (इलेक्ट्रीक कोर्स) शैक्षणिक पात्रता-किमान इ. ९ वी पास वयोमर्यादा: 16 ते 40 वर्ष, प्रशिक्षण कालावधी: 1 वर्ष, फक्त दिव्यांग मुलांनाच प्रवेश दिला जातो. सोयी व सवलती प्रशिक्षण कालावधीत राहण्याची, जेवणाची व प्रशिक्षणाची मोफत सोय, अद्यावत व परीपूर्ण संगणक कार्यशाळा, भरपूर प्रॅक्टीकल्स व व्यवसायाभिमुख मोफत प्रशिक्षण, नेटवर्कींग व इंटरनेटची सुविधा, अनुभवी व तज्ञ निदेशक, उज्वल यशाची परंपरा आणि समाज कल्याण विभागाकडून स्वयराजगारासाठी व्यवसायासाठी बीज भांडवल याजना अर्ज केंव्हा, कसे व कोठे करावेत प्रवेश अर्ज व माहितीपत्रक अधिक्षक, शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, टाकळी रोड, म्हेत्रे मळा, गोडद मळ्याजवळ, मिरज ता. मिरज जि. सांगली पिनकोड: 416 410 नंबर 0233-2222908,मोबाईल 9922577561, 9595667936 या पत्यावर पोस्टा व्दारे किंवा समक्ष मोफत मिळतील. प्रवेशासाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही. प्रवेश अर्ज पूर्णपणे भरुन फोटोसह संस्थेकडे पाठवावेत किवा समक्ष भरुन द्यावेत प्रवेश अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, SSC मार्कशिट व प्रमाणपत्र अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, UDID कार्ड, Domicile प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला यांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. प्रवेश अर्ज संस्थेकडे पाठवावेत, प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानंतर तज्ञ समिती व्दार मुलाखती घेऊन प्रवश देण्यात येईल. माफक जागा असल्याने गरजू दिव्यांगाना या सुवर्ण संधीचा लाभ घेण्यासाठी त्वरीत संपर्क साधा. ग्रामीण व शहरी भागातील लोकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्ञात असलेल्या गरजू दिव्यांग बांधवाना या शासकीय योजनची माहिती करून द्यावी, असे आवाहन अधिक्षक, शासकीय प्रौढ अपंग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, मिरज यांनी केले आहे.

## परळीत डेंगूची साथ; नगरपालिकेने जंतुनाशक फवारणी करावी - प्रा.विजय मुंडे

### सात दिवसाच्या आत संपूर्ण परळी शहरात फवारणी करावी अन्यथा प्रा.टी.पी.मुंडे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेवर भव्य मोर्चा...

**परळी /प्रतिनिधी** परळी शहरामध्ये सध्या डेंगूच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. नगरपालिका प्रशासनाने कसल्याही प्रकारच्या उपाययोजना केल्या नाहीत. शहरात जंतुनाशक फवारणी करण्यात आली नाही. त्यामुळे डेंगूची साथ पसरत चालली आहे येत्या सात दिवसांमध्ये फवारणीला सुरुवात करावी अन्यथा महाराष्ट्राचे ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेवर भव्य मोर्चा काढण्यात येईल तसेच पालिकेला कुलूप ठोकण्यात येईल असा इशारा नगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा परळी मार्केटचे माजी उपसभापती प्रा. विजय मुंडे यांनी दिला आहे.

सध्या पावसाळ्याच्या दिवसांमध्ये गेल्या चार दिवसापासून शहरासह परिसरात चांगल्या प्रकारचा पाऊस झाला असून शहरात अनेक ठिकाणी नाल्या दुरुस्त नाहीत सगळीकडे खड्डे असल्यामुळे तेथे पावसाचे पाणी साठल्यामुळे तेथे डेंगूच्या मच्छरांची वाढ मोठ्या प्रमाणावर होत आहे . नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

नगरपालिकेने नागरिकांच्या आरोग्याची खेळू नये. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे ही नगरपालिकेची जबाबदारी आहे. पालिकेचे मुख्याधिकारी यांनी यामध्ये विशेष लक्ष घालावे आणि येत्या सात दिवसांमध्ये जंतुनाशक परळी शहरांमध्ये फवारणी करावी अन्यथा नागरिकांच्या आरोग्याच्या हितासाठी नगरपालिकेवर महाराष्ट्राचे ओबीसी नेते प्रा.टी.पी. मुंडे सरांच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चा काढण्यात येईल त्याची सर्वस्व जबाबदारी ही नगरपालिका प्रशासनाचे असेल असा इशारा त्यांनी दिला आहे.



# विशालगड गाजापूर घटनेच्या निषेधार्थ पाटोदा मुस्लिम समाजाचा तहसीलवर निषेध मोर्चा संपन्न

## हल्लेखोरणा तात्काळ अटक करा मागणी

**पाटोदा/प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्ह्यातील विशालगड व तसेच गाजापुर या या ठिकाणच्या गरीब मुस्लिम कुटुंबावर व तसेच ठिकाणच्या धार्मिकस्थळ मस्जिद व दर्गावर जातीवादी संघटनांनी भ्याड हल्ला करून दहशतीचे वातावरण निर्माण केले या घटनेचा निषेध व्यक्त करत पाटोदा येथील मुस्लिम समाजाने शुक्रवारी दुपारी तीन वाजता पाटोदा तहसीलवर निषेध मोर्चा काढला होता या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम समाजाच्या लोकसह इतर समाजाच्या लोकांनी सुद्धा सहभाग नोंदविला यावेळी प्रामुख्याने या घटनेतील दहशतवादी लोकांना अटक करून त्यांच्यावर कठोर कायदे कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली मागण्याचे निवेदन तहसीलदार मार्फत राज्याचे मुख्यमंत्री यांना देण्यात आले विशालगड व तसेच गाजापुर गावात गरीब मुस्लिम कुटुंबावर व तसेच धार्मिक स्थळावर दिनांक 14 जुलै रोजी दहशतवादी गटाच्या लोकांनी नियोजित पद्धतीने या ठिकाणच्या मुस्लिम महिला लहान मुले वरती लोकांना अमानुष पणे मारहाण करून त्यांचे दुकाने घरे चार चाकी वाहने त्याची जाळपोळ केली तसेच अत्यंत चिड निर्माण करणारी घटना म्हणजे येथील मुस्लिम समाजाच्या धार्मिक स्थळाचे पावित्र्य नष्ट केल त्या घटनेचा निषेध करत पाटोदा येथे मुस्लिम समाजाने




शुक्रवार दिनांक 19 रोजी दुपारी जुम्माची नमाज झाल्यानंतर निषेध मोर्चा काढला या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम समाजाने आपला सहभाग नोंदवला मूक मोर्चा राज मोहम्मद चौकातून मार्गक्रमण करत तहसील मध्ये पोहोचला त्या ठिकाणी या मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. विशेष म्हणजे या निषेध मोर्चामध्ये अनेक हिंदू बांधवांनी सुद्धा आपला सहभाग नोंदवला यावेळी सकल मराठा आरक्षण समितीचे सुरेश टिपटे शेतकरी कामगार पक्षाचे विष्णुपंत घोलप राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष गणेश कवडे वंचित बहुजन गोरख झेड आदीनी आपले विचार मांडले यावेळी आपले विचार मांडताना सुरेश टिपटे यांनी मराठा आरक्षण समिती मुस्लिम समाजाच्या सदैव पाठीशी आहे असे सांगत झालेल्या घटनेचा त्यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त करून यामध्ये दोशीवर कडक कारवाई करावी अशी मागणी केली याचवेळी गणेश कवडे विष्णुपंत घोलप व गोरख झेड यांनी सुद्धा आपले मनोगत मांडताना सध्या विधानसभेच्या निवडणूका जवळ आल्या असल्याने राज्य सरकार हिंदू मुस्लिम यामध्ये जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न जातीयवादी संघटना कडून होत असून याला राज्य सरकार पाठबळ देत असल्याचा आरोप अनेकांनी आपल्या बोलण्यातून केला यावेळी समाजातर्फे खालील मागण्या करण्यात आल्या यामध्ये हल्लेखोरावर कारवाई करण्यात यावी संबंधित ठिकाणच्या निष्क्रिय पोलीसअधिकारी व कर्मचाऱ्यावर तात्काळ निलबनाची कार्यवाही करावी झालेले हल्ल्यामध्ये धार्मिक स्थळी व मुस्लिम समाजाची घरांची शासनाने भरपाई द्यावी हल्ल्यातील जखमी व्यक्तींना पाच लाख रुपये प्रत्येकी सरकार तर्फे मदत देण्यात यावी मुस्लिम समाजासाठी संरक्षण कायदे तात्काळ करून विशेष अधिवेशनात हे कायदे तात्काळ पारित करण्यात यावी या सर्व घटनेची. सीआयडी मार्फत चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी अशा मागणीची निवेदन पाटोद्याची तहसीलदार निलावडे यांच्यामार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना देण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार बन तसेच पाटोदा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक केदार हे उपस्थित होत या निषेध मोर्चाचे आयोजन सर्वच मुस्लिम समाजाच्या राजकारणी व्यक्तींनी तसेच प्रतिष्ठित व्यक्तींनी केले होते यामध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम समाजाचे लोकसह इतर समाजाचे लोकांनीही सहभाग नोंदविला सामुहिक राष्ट्रगीता नंतर कार्यक्रम संपन्न झाला सहायक पोलीस निरीक्षक केदार यांनी पोलीस बंदोबस्त यावेळी चोक ठेवला होता

# दक्षिणमुखी हनुमान मंदिर येथे महिला भक्तगणांची दिंडी संपन्न

**बीड /प्रतिनिधी**

बीड येथील सर्वात जुन्या व प्रसिद्ध अशा दक्षिण मुखी हनुमान मंदिर जुनी भाजी मंडई येथे पिंगळे गल्ली येथील महिला भक्त भजनी मंडळ व बीड शहरातील महिला भजनी मंडळ काल दिवसभर एक आषाढी एकादशी निमित्त आषाढी एकादशीच्या निमित्य साधून भजन गवळण भारुड अभंग नामस्मरण चिंतन विठ्ठल रुक्मिणी पूजन व सामाजिक कार्य करून सर्व माता भगिनी यांनी परिसरात डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन व गळ्यामध्ये विना टाळ मृदंग भगवंताचे नामस्मरण करून पहावा विठ्ठल अनुभवा विठ्ठल राम कृष्ण हरी विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल ज्ञानोबा माऊली तुकाराम इत्यादी भजने म्हणून परिसरामध्ये पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते व पायी दिंडी काढण्यात आली होती दिंडी समाप्तीनंतर संपूर्ण दिवसभर नामस्मरण करून भजन कीर्तन करून संपूर्ण दिवसभर मंगलमय प्रसंगी पिंगळे गल्ली खडकपुरा बार्शी रोड भागातील माता भगिनी या दिंडीमध्ये सहभागी झाल्या होत्या अत्यंत भक्तीमय वातावरणात उत्साहवर्धक भजनी मंडळातील सहकारी महिला भगिनी यांनी भजने



म्हटली परिसरातील असंख्य महिला या दिंडीमध्ये उपस्थित होत्या विशेषतः दिवसभरातील धार्मिक कार्यक्रम व आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचे आयोजन पिंगळे गल्ली येथील महिला भजनी मंडळ इंदुबाई पिंगळे शांताबाई तापडिया वृंदावनी साळुंखे शीलाताई ठाकूर अनिता पंडित सुरेखा जाधव सारिका पन्हाळकर सुनिता सुसकर शालिनीताई जाधव सुरेखा भोंडवे भारती ठाकूर सुनंदा वेदपाठक आदी सह महिला भगिनी तसेच बालगोपाल या दिंडी सोहळ्यामध्ये सामील झाल्या होत्या भगवंताच्या नामस्मरणात आषाढी वारी निमित्त ही दिंडी सोहळा मोठ्या उत्साहवर्धक व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला

# निदान शाळेत जायला रस्ता तरी द्या !दासखेड परिसरातील वस्तीतील मुले २ किलोमीटर चिखल तुडवीत शाळेत जातात.

**पाटोदा /प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील आरगडे वस्ती, पवार वस्ती, शिंदे वस्ती,निर्मळ वस्ती, गोरे वस्ती येथील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दासखेड गावातील जिल्हा परिषद आणि रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत जाण्यासाठी पावसाळ्यात २ किलोमीटर अंतर हातात चप्पल घेऊन जावे लागत अनवानी पायाने चिखल तुडवीत जाव्यात अशी लागते.निदान शाळेत जाण्यासाठी सरकारने चांगला रस्ता तरी बनवुन द्यावा अशी आर्तहाक दिली असुन तातडीने रस्ता करून देण्यात यावा अशी मागणी केली आहे. ३०० लोकांचा वावर, अपघाताच्या



घटना पण शासनाला पाझर फुटेना :- प्रविण शिंदे (वस्तीवरील ग्रामस्थ ) दासखेड पासुन २ किलोमीटर अंतरावरील आरगडे, पवार,निर्मळ, शिंदे,गोरे आडनावांची लोकं वस्तीवर वास्तव्य करत असुन दररोज जवळपास ३०० लोकांचा राबता याच रस्त्यावरून आहे. मात्र पावसाळ्यात रस्त्याची दुरावस्था होत असल्याने शालेय विद्यार्थी, बाजारहाट, दवाखाना, दुधदुभतं, भाजीपाला,खत बि बियाणे तसेच ईतर कामांसाठी गावात येजा करावी लागते.परंतु पावसाळ्यात चिखलामुळे अडचण येत असुन गाड्या घसरुन अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत.शासनाने आम्हा वस्तीवरील ग्रामस्थांसाठी रस्ता दुरुस्त करून देण्यात यावा.अशी मागणी वस्तीवरील ग्रामस्थ नारायण शिंदे, भगवान शिंदे, सतिश ठाकुर,काका पवार यांनी केली लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन ज्या पद्धतीने लाडकी बहिण योजनेसाठी रविवार सुट्टी असुन देखील शनिवार - रविवार दोन दिवशीय शिबिर घेण्यासाठी जिल्हा प्रशासन धावपळ करताना दिसत आहे.तेच लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन मात्र ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुलभूत सुविधा असणा-या रस्त्याच्या दुरावस्थेकडे लक्ष द्यायला तयार नाही. ग्रामस्थांनी शासन दरबारी हेलपाटे मारुन सुद्धा त्यांच्या पदरी निराशाच पडत असुन दुसरीकडे मात्र अधिकारी आणि गाव पुढारी संगनमताने कागदोपत्रीच बोगस रस्त्यावर लाखों रूपयांचा मलिदा खाताना दिसत आहे. हि बाब अतिशय लाजीरवाणी आहे. असा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर गणेश ढवळे यांनी केला आहे

# कोल्हापूर येथील घटनेच्या निषेधार्थ रांजणी बंद यशस्वी

**जालना/असलम कुरेशी**

कोल्हापूर जिल्ह्यातील विशालगड येथील अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली विशालगड पासून पाच किलोमीटर अंतरावरील मुस्लिम बहुल वस्तीचे गाव गजापूर येथील वस्तीमध्ये घरांची तोडफोड करून लहान मुले, महिला व वृद्धांना मारहाण केली व त्यांच्या गाड्या पेटवण्यात आल्या व घरातील मौल्यवान वस्तूंची चोरी केली. तसेच रजा



जामा मशिदीमध्ये घुसून तोडफोड केली. धार्मिक ग्रंथ कुराणला जाळण्यात आले व मशिदीची तोडफोड केली. यामध्ये संपूर्ण मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या गेल्याने सकल मुस्लिम समाजाच्या वतीने शुक्रवारी संपूर्ण रांजणी बंदची हाक देण्यात आली होती. या बंदला व्यापारी व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शुक्रवारी रांजणीचा आठवडी बाजार असतो. परंतु मुस्लिम समाजाच्या वतीने बंदचे आवाहन केल्याने आठवडी बाजारासह संपूर्ण गांव बंद होते. यासंदर्भात घनसावंगी पोलिस ठाणे व तलाठ्याच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की दंगल करणाऱ्यांच्या विरोधात त्वरित कार्यवाही करण्यात यावी नसता पुढील काळात रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल याची शासनाने दखल घ्यावी. या बंदमध्ये सकल मुस्लिम समाजाने सहभाग नोंदविला.

# रांजणी येथे ग्रामपंचायतच्या वतीने धुर फवारणी

**जालना/असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथे ग्रामपंचायतच्या वतीने पावसाळ्यात दुर्गंधी पसरून डासांचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून गावात धुर फवारणी करण्यात आली. सध्या गावात मोठ्या प्रमाणात डासांचा प्रादुर्भाव वाढलेला असून या डासांचा बंदोबस्त करण्यासाठी गाव पातळीवर ग्रांमपच्यातच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. ग्रामपंचायतच्या वतीने गावात धुर फवारणी करण्यात आली. रांजणी ग्रामपंचायतचे सरपंच अमोलभाऊ देशमुख, उपसरपंच शेख रहीम व ग्रामविकास अधिकारी शिवाजी चेके



यांच्या मार्गदर्शनाखाली रांजणी येथे धुर फवारणीला सुरुवात करण्यात आली. यावेळी सरपंच अमोलभाऊ देशमुख, उपसरपंच शेख रहीम, ग्रामविकास अधिकारी शिवाजी चेके, ग्रामपंचायत सदस्य दिपक वरखडे, सय्यद मक्सुद अली, इरफान मुसा कुरेशी, दगडू भालेकर, इरफान शाह, कैलास वरखडे, ज्ञानेश्वर शिंगणे, भगवानसिंह जनकवार, असलम बागवान, सुदाम पवार, केशव जाधव, शिवाजी पाटोळे, इरफान बुढण कुरेशी, रमण जाधव, फारुख बागवान, संतोष गोसावी, सहदेव लगामे, पांडू पाटोळे, भगवान पाटोळे, नानाभाऊ पाटोळे आदी उपस्थित होते.

# रोजगार हमीचा आणखी दहा गावातील घोटाळा दिला चौकशीला-अँड. अजित देशमुख

**बीड/प्रतिनिधी**

धोंड राई येथील रोजगार हमीच्या कामातील घोटाळा बाहेर आल्यानंतर गेवराई तालुक्यातील आणखी दहा गावांमध्ये असे प्रकार घडले असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे हा सर्व प्रकार प्रशासनाकडे तपासणीचा दिला आहे. अहवाल आल्यानंतर अधिकारी किती पारदर्शक काम करतात ? हे कळेल आणि त्यानंतर आपण केंद्राकडे जायचे का राज्याकडे हे ठरवणार असल्याचे जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.

सर्वसामान्य शेतकऱ्याची फसवणूक आणि लुबाडणूक कमी होणे गरजेचे आहे. लाभार्थ्यांना लाभ देत असताना अर्धी रक्कम खर्ची घातल्यासारखी परिस्थिती होते. त्यामुळे प्रत्यक्षात काम करताना शेतकऱ्यांना अडचण येतात. याकडे अधिकाऱ्यांचे लक्ष नाही.

रोहयो घोटाळ्याची चौकशी करताना अधिकारी मजेशीर चौकशी करतात. याचे काम त्याला आणि त्याचे काम याला दाखवून घोटाळा लपवण्यात हे अधिकारी माहीर आहेत. मात्र जिओ टॅगिंग वगैरे पाहिले तर हे सर्व प्रकार उघडकीस येतील.

चौकशी समिती नेमली जाते. मात्र चौकशी व्यवस्थित केली जात नाही. या चौकशी समितीचे अहवाल आल्यानंतर ठराविक रस्त्याचे काय झाले, हे कळेल. पांदन रस्ते अथवा रोजगार हमीतले अन्य रस्ते योग्य पद्धतीने तपासली गेले नाही तर त्याचे परिणाम अधिकाऱ्यांना भोगावे लागतील.

वैयक्तिक लाभाच्या सर्व योजनांसह सार्वजनिक कामातील गैरप्रकार थांबले पाहिजेत. त्याशिवाय शेतकऱ्याची उन्नती होणार नाही. शेतकऱ्यांना जाण्यासाठी रस्ते होणार नाहीत. मग अधिकाऱ्यांची गुर्मी कुठे आणि कशी उतरवायची याचा आम्हाला अभ्यास आहे. त्यामुळे अहवाल आल्यानंतर तो कोठे देऊन अधिकाऱ्यांची चौकशी लावायची, हे आम्ही ठरवू , असेही ऍड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# गजापूर येथील मुस्लिम समाजावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ अंबाजोगाईत मोर्चा




**अंबाजोगाई/परवेज पटेल**

विशालगड गजापूर येथील मुस्लिम सामाजाच्या घरावर मशीदीवर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या विरुद्ध अंबाजोगाई येथील सुन्नी उलमा कौन्सलच्या वतीने निषेद मोर्चा काढण्यात आला यावेळीच्या हजारोंच्या संख्येने मुस्लिम बांधव या मोर्चात सामील होते. विशाल गडावरील गजापूर हे गाव तेथील 30-40 मुस्लिम समाजाच्या घरावर जो भ्याड हल्ला केला त्याला अतिक्रमाणाचे नाव देऊन जो खेळ मांडला तो कुठेतरी थांबण्याकरिता हा निषेध मोर्चा होता. असे बरेचसे हल्ले महाराष्ट्राच्या बाहेर झाले. त्यावेळीही निषेध मोर्चे काढण्यात आले, पण ह्या हल्ल्याची दखल जर सरकारने घेतली नाही आणि मुस्लिम संरक्षण कायदा लागू केला नाही. तरी येणाऱ्या वेळी मुस्लिम समाज शांत राहणार नाही असाही इशारा देण्यात आला. सदर बाजार चौकातून हा मोर्चा उपजिल्हाधिकारी कार्यालय येथे दाखल झाला. त्यावेळी दिलेल्या निवेदनात प्रमुख मागण्या मुस्लिम समाजाच्या हेतूने संरक्षण कायदा बनविण्यात यावा. मुसलमानाच्या धार्मिक स्थळाचे संरक्षण करण्यासाठी मोहम्मद पैगंबर बिल मंजूर करण्यात यावे, वक्फ संपत्ती संरक्षण कायदा करण्यात यावा, गजापूर येथील जखमींना नुकसान भरपाई म्हणून प्रत्येकी दहा लाखाची मदत करण्यात यावी, वरील सर्व परिस्थितीचे गांभीर्यपूर्वक विचार करावा व या मधील दोषीवर कडक स्वरूपाची कायदेशीर कारवाई करून त्यांच्यावर युएपीए अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावेत, असा उल्लेख निवेदनात असून सुनी उलिमा कौन्सिल व सकल मुस्लिम समाजाच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले

# कुसळंब येथील श्री.साईनाथ मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त साईनाथ गुरुपूजन सोहळा

**पिंपळवंड/प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही गुरुपौर्णिमेनिमित्त श्री.साईनाथ मंदिर येथे दि.२१/०७/२०२४ रविवार रोजी गुरुपूजन सोहळा संपन्न होत असून या सोहळ्याचा पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प.इंद्रराज गायकवाड महाराज,ह.भ.प.गहिनीनाथ मिसाळ महाराज,पुजारी हनुमंत धनवटे यांनी केले आहे.



यानिमित्त शनिवार दि.२०/७/२०२४ रोजी सकाळी १० वाजता कलशपूजन होऊन सायंकाळी ६ वाजेपर्यंत साईनाथ गुरु चिंतन व जप अनुष्ठान गुरु मंत्र जप अखंड चालू राहील. सायंकाळी ८ ते पहाटे ४ वाजेपर्यंत सार्वजनिक हरिजागर कार्यक्रम होईल. तसेच गुरुपौर्णिमा रविवार दि.२१ रोजी सकाळी पहाटे ४ ते ६ काकडा,७ ते ८ वाजता श्री साईबाबा अभिषेक ९ ते १० श्री साईबाबांची पालखी खंडेश्वर मंदिरात जाऊन खंडेश्वराचे व श्री. साईबाबांचे पादुका पूजन सोहळा होईल.१० ते १२ वाजेच्या दरम्यान ह. भ.प.इंद्रराज महाराज गायकवाड यांच्या प्रवचनानंतर दुपारी १ वाजता श्री.साईबाबांची आरती होऊन त्यानंतर महाप्रसाद होईल. या सर्व कार्यक्रम सोहळ्याचा व महाप्रसादाचा भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा.


# २५ % डब्ल्यू जी ३ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे

पावर पंपासाठी कीटकनाशकाची मात्रा तीनपट वापरावी.कीटकनाशकांचा वापर करताना हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा.सोयाबीन पिकावरील विविधकीड नियंत्रणासाठी उपाययोजना. जिल्ह्यामध्ये खरीप हंगामात सोयाबीन पिकाची३५३६६१ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झालेले असून पावसाला चांगली सुरुवात झालेली आहे. सध्या सोयाबीन हे वाढीच्या अवस्थेत असून सततचे पाऊस व ढगाळ वातावरणामुळे पिकावर पाने खाणारी अळी, तंबाखूवरील पाने खाणारी अळी, उंट अळी, चक्रीभुंगा, पांढरी माशी, मावा, तुडतुडे इत्यादी किडींचे प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर किडींचे वेळीच व्यवस्थापन करणे हे फार महत्वाचे आहे. त्याकरीता जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषि विभाग व कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार खालील एकात्मिक पद्धतीचा अवलंब करावा. एकात्मिक कीड व्यवस्थापनयांत्रिक पद्धती.. अंडी व अळीग्रस्त पाने अलगदतोडून किडीसह नष्ट करावीत.हिरवी घाटे अळी व तंबाखूची पाने खाणारी अळी या किडीची हेक्टरी ५ कामगंध सापळे शेतात लावावेत. जैविक पद्धती..तंबाखूवरील पाने खाणाऱ्या ( स्पोडोप्टेरा) अळीच्या व्यवस्थापनासाठी एस.एल. एन.पी.व्ही ५०० एल.ई. विषाणू २ मि.लि प्रती लिटर पाणी किंवा नोमुरिया रीलाई या बुरशीची ४ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. सायनीक पद्धती..पाने खाणाऱ्या अळ्या :- प्रोफेनोफोस ५० ईसी २० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट १.९ ईसी ११.५ मिली किंवा क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ एससी ३ मिली किंवा फ्ल्युबेन्डामाईड ३९.३५ ईसी ३ मिली किंवा फ्ल्युबेन्डामाईड २० डब्ल्यूजी ५-६ ग्रॅम किंवा इन्डोक्झाकार्ब १५.८ ईसी ७ मिली किंवा स्पायनोटेरम ११.७ एससी ९ मिली किंवा नोव्हाल्यूरॉन ५.२५% + इन्डॉक्झाकार्ब ४.५ % एससी १७ मिली किंवा थायामिथॉक्झाम १२.६ % + लॅम्बडा-सिहॅलोथ्रीन ९.५ % झेडसी २.५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. पाने पोखरणारी अळी :- मोनोक्रोटोफॉस ३६ एसएल ८.५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. चक्रीभुंगा, खोडमाशी :- क्लोरॅंट्रानीलीप्रोल १८.५ एससी ३ मिली किंवा थायाक्लोप्रीड २१.७ एससी १५ मिली किंवा इथिऑन ५० ईसी ३० मिली किंवा थायामिथॉक्झाम १२.६ % + लॅम्बडा- सिहॅलोथ्रीन ९.५ % झेडसी २.५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. तुततुडे, पांढरीमाशी, मावा: पीक २०-२५ दिवसांचे असतांना सुरवातीला ५% निबोंळी अर्काची फवारणी करावी पांढऱ्या माशीकरीता पिवळे चिकट सापळे १०-१२ प्रति एकरी लावावे, विद्यापीठाच्या तत्पुरत्या शिफारशीनुसार थायमिथोक्झाम २५% डब्यूजी २ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून अलटून पालटून फवारावे. पावरपंपासाठीकीटकनाशकाचीमात्रातीनपटवापरावी. कीटकनाशकांचा वापर करताना हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा.

# पूजा खेडकर प्रकरणात UPSC तर्फे गुन्हा दाखल सघ लोकसेवा आयोगाने सुरु केली कारवाई

## निवड रद्द का करु नये? कारणे दाखवा नोटीस

**पूजा खेडकर यांच्यावर फौजदारी खटल्यासह तिच्याविरुद्ध अनेक कारवाई सुरू केल्या आहेत. त्यांची सिव्हिल सर्व्हीसची उमेदवारी रद्द करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस (SCN) जारी केली आहे. सेवा परीक्षा-२०२२ / नागरी सेवा परीक्षा-२०२२ च्या नियमांनुसार ही नोटीस दिली आहे. तसेच भविष्यातील परीक्षा/निवडीपासून बंदी केली आहे. पूजा खेडकर विरोधात आता सरळ संघ लोकसेवा आयोगाने कारवाई सुरु केली आहे. यामुळे पूजा खेडकर यांची आयएएस म्हणून झालेली निवड रद्द होण्याची शक्यता आहे. गाडी, कॅबिन, खासगी गाडीवर अंबर दिवा हे प्रकार करणारी पूजा खेडकर यांची निवडच धोक्यात आली आहे.**



**मुंबई/प्रतिनिधी**

वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर चांगलीच अडचणीत आली आहे. विविध पातळ्यांवर चौकशी सुरु असताना आता थेट केंद्रीय लोकसेवा आयोगाने (UPSC) कारवाई सुरु केली. यूपीएससीकडून पूजा खेडकरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांना तुमची आयएएसची निवड का रद्द करु नये? अशी नोटीस पाठवली आहे. राज्य शासनाने चौकशी सुरु केली आहे. पंतप्रधान कार्यालयाने या प्रकरणी अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत. लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी, मसूरीकडून त्यांना तातडीने परत बोलवले आहे. दुसरीकडे पूजा खेडकर यांच्या आईला अटक झाली आहे. वडिलांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी सुरु आहे. यामुळे पूजा खेडकर यांच्यापुढे अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे.

यूपीएससीकडून सर्वात मोठे पाऊल यूपीएससीने नागरी सेवा परीक्षा-2022 च्या तात्पुरत्या शिफारस केलेल्या उमेदवार पूजा मनोरमा दिलीप खेडकर यांच्या गैरवर्तनाचा तपशीलवार आणि सखोल तपास केला आहे. या तपासणीतून पूजा खेडकर यांचे कारनामे उघड झाले आहे. त्यांनी यूपीएससी परीक्षा नियमांनुसार दिली नाही. परवानगी असलेल्या मर्यादेच्या पलीकडे जाऊन तिचे नाव, तिच्या वडिलांचे आणि आईचे नाव, तिचे फोटो/स्वाक्षरी, तिचा ईमेल आयडी, मोबाईल नंबर आणि पत्ता बदलून तिची ओळख खोटी करून फसवणूक केली. त्यामुळे यूपीएससीने पोलिसांकडे एफआयआर दाखल केला आहे.

## शैलेंद्र पोटभरे यांच्या उपस्थितीत रिपाई एकतावादीचा संकल्प मेळावा बहुसंख्येने उपस्थित रहा- जावळे डोंगरे



**धारूर/प्रतिनिधी**

धारूर तालुका मोजे चौरंबा व चारदरी येथे रिपाई एकतावादी शाखा उद्घाटन सोहळा व कार्यकर्ता संकल्प मेळावा दिनांक २१ रोजी रविवार सायंकाळी ६.५० आयोजित केला असून या मेळाव्यात समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून शैलेंद्र पोटभरे जिल्हाध्यक्ष उपस्थित राहणार आहेत, असे आव्हान धारूर तालुका कार्याध्यक्ष संतोष जावळे तालुका उपाध्यक्ष इंद्रजीत डोंगरे यांनी केले तालुक्यातील समाज बांधवांनी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आव्हान केले.

## गजापुर घटनेच्या निषेधार्थ केज शहर कडकडीत बंद तिरंगा झेंडा घेऊन तहसिल कार्यालयावर महामोर्चा !

**केज/सचिन भालेराव**

कोल्हापुर जिल्ह्यातील गजापुर (विशाळगड) येथील हल्ल्या प्रकरणी सर्व स्तरातुन निषेध होत आहे.आज या घटनेच्या निषेधार्थ केज शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते. सर्व व्यापार्यांनी आप आपले व्यवहार बंद ठेवले होते.दुपारी २ वाजता दर्गाह या ठिकाणाहुन तहसिल कार्यालयावर मुस्लिम समाजाचा मोर्चा काढण्यात आला होता.या मोर्चाला शहरातील मुस्लिमांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या प्रकरणी तहसिलदार यांना आपल्या मागण्याचे निवेदन देण्यात आले. गेल्या काही दिवसापुर्वी विशाळगड गजापुर येथे वाद विवाद निर्माण करून विशिष्ट समाजाला टार्गेट करण्यात आले. यात येथील घराची तोडफोड व धार्मिक स्थळांची विटंबना करण्यात आली.या घटनेचा सर्व स्तरातुन निषेध केला जात आहे. या प्रकरणातील दोषी विरोधात कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी दि.१९ जुलै २०२४ रोजी केज शहर बंद पाळण्यात आला. शहरातील व्यापार्यांनी आप आपले व्यवहार बंद ठेवले होते. दुपारी २ वाजता दर्गाह मैदान पासुन तहसिल कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम बांधवांची उपस्थिती होती. आपल्या मागण्याचे निवेदन तहसिलदार यांना देण्यात आले.




विशाळगड घटना प्रकरणाचा जाहिर निषेध- खा.सोनवणे

दोषी विरोधात कारवाई करावी विशाळगड घटने प्रकरणाचा आपण जाहिर निषेध करत असून अतिक्रमणे सरसकट काढण्याची कारवाई प्रशासनाने तातडीने करावी.अतिक्रमणाचे समर्थन होवूच शकत नाही परंतु अशा घटना आडून महाराष्ट्राची सामाजिक घडी कोण विसकाटू पाहात आहे याचा शोध घेतला पाहिजे.कोणीही कायदा हातात घेवू नये,जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी,शिवराय,शाहु,फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात अशा घटना समर्थनीय नाही असे बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी म्हंटले आहे.

केज शहर बंद पाळण्यात सकल मराठा समाजाचा पाठिंबा गजापुर (विशाळगड) येथील हल्ल्या प्रकरणी सर्व स्तरातुन निषेध होत आहे.आज या घटनेच्या निषेधार्थ केज शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते.या आव्हानात सकळ मराठा समाज तसेच शेतकरी कामगार पक्ष व वंचीत बहुजन आघाडीच्या वत्तीने पाठिंबा देण्यात आला.

## जाती दावा पडताळणीतील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी २२ ते ३१ जुलै दरम्यान विशेष मोहिमेचे आयोजन

बीड, दि. 19, : शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्र अभावी गैरसोय होवू नये. तसेच कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये याकरिता जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड मार्फत विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्ततेसाठी व तयार असलेले जात वैधता प्रमाणपत्र समितीस्तरावरुन निर्गमित करण्यासाठी दि.22.07.2024 ते दि.31.07.2024 या कालावधीत विशेष मोहिम आयोजित करण्यात आली आहे. सन 2024-25 या शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता 11 वी, 12 वी विज्ञान व व्यावसायिक पाठ्यक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी बीड समितीच्या कार्यक्षेत्रातील ज्यांचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणी होवून जात वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी समितीकडे अर्ज दाखल केलेले आहेत. अशा सर्व जाती दावा प्रकरणामध्ये समितीस्तरावर प्राथमिक छाननी करुन ज्या प्रकरणामध्ये कागदपत्रे/पुरावे अभावी त्रुटी आढळून आलेली आहे, अशा प्रकरणामध्ये विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या जाती दावा प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस (SMS) द्वारे अथवा लेखी पत्रान्वये त्रुटी असल्याचे कळविण्यात आलेले आहेत. अशी शैक्षणिक, सेवा, निवडणुक व इतर कारणासाठी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव कार्यालयात प्रलंबित आहेत. महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातोचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 मधील कलम 8 अन्वये जाती दावा सिध्द करण्याची जबाबदारी ही अर्जदार यांची असल्याने जाती दावा पडताळणीकामी तात्काळ समितीकडे आपल्या प्रकरणातील त्रुटी पुर्तता करण्यात यावी. जेणेकरुन सन 2024-25 या पुढील शैक्षणिक वर्षामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व्यावसायिक पाठ्यक्रमाकरीता राखीव प्रवर्गातून आरक्षीत जागेवर प्रवेश घेण्यासाठी संबंधित विद्यार्थास प्रवेश प्रक्रिया नोंदणी अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तरी या कार्यालयात त्रुटी पुर्ततेअभावी आपला जातीदावा समितीकडून फेटाळण्यात आल्यास तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी, निवडणूक, सेवेसाठी अपात्र ठरल्यास याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार व उमेदवारांची राहील. त्यामुळे समितीच्या वतीने विशेष अभियान दि.22.07.2024 ते दि.31.07.2024 या कालावधीत कार्यालयीन वेळेत प्रमाणपत्र पडताळणी त्रुटी पुर्तता विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष शिबीराचा जास्तीत जास्त अर्जदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

अतिरिक्त अन्नद्रव्य मिळून त्याचे चांगले परिणाम दिसतात. युरिया फेकून किंवा पेरून देण्यापेक्षा पाण्यात मिसळून फवारणीद्वारे दिला तर अत्यंत कमी खतामध्ये चांगले परिणाम दिसतात. युरियाला पर्याय म्हणून काही नत्रयुक्त विद्राव्य खते बाजारात उपलब्ध आहेत. आता युरिया चे नॅनो युरिया रूप देखील किफायतशीर असून एक गोणी युरिया एवढे परिमाण एक बॉटल नॅनो युरिया चे आहेत. नॅनो डीएपी मधूनही नत्र व लवकर शोषला जाणारा स्फुरद देखील मिळतो. शेंगा भरण्याच्या काळात अशा फवारणी उपयुक्त ठरते. देशात उत्पादित होणारा आणि आयातीत युरिया सर्व उत्पादक व पुरवठादार यांना नीम कोटिंग करूनच पुरवठा व विक्री करणे बंधनकारक आहे. अनियंत्रित युरिया वापराचे दुष्परिणाम म्हणून आता अधिकृतपणे युरिया खताचे समवेत नॅनो युरिया व डीएपी चे आवंटन जिल्ह्यांना देण्यात येते. शेतकरी, जल, जंगल, जमीन, सजीव, या सर्वांचे भल्यासाठी, पर्यावरणासाठी आता आपणास जाणीवपूर्वक युरिया चा वापर कमी करावा लागेल. पर्यायी उपाययोजना करून, संतुलन करून नत्र या मूलद्रव्याची गरज भागवावी लागेल. शास्त्रज्ञ डॉ. देवळाणकर, बाबासाहेब जेजुरकर, कृषी अधीक्षक बीड यांनी संयुक्तरीत्या लिहीले आहे.

## पिकअप चोरी करणारा चोरटा दोन पिकअपसह लातुर जिल्हयातुन केज पोलीसांनी घेतला ताब्यात.

**केज/सचिन भालेराव**

पोलीस स्टेशन केज येथे गुरनं.३८७/२०२४ कलम ३०३ (३) बीएनएस व गुरनं.३९४/२०२४ कलम ३७९ प्रमाणे पिकअप चोरीचे अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हे दाखल होते. पोलीस स्टेशन केज व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय केज येथील कर्मचारी हे नमुद गुन्हयात चोरी गेलेले दोन पिक अप चा शोध घेत असतांना त्यांना यांनी गुप्त बातमीदारां मार्फत माहिती मिळाली की सदर गुन्हयातील चोरी गेलेले पिकअप हे लातुर जिल्हयात असल्याची माहिती मिळाल्यावरुन मा. सहा. पोलीस अधीक्षक कमलेश मीना व पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन पोलीस स्टेशन केज़ यांचे मार्गदर्शनाखाली पथक तयार करुन आरोपीचे शोध कामी रवाना केले होते. सदर पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर गुन्हयातील आरोपीतास लातुर जिल्हयातील रेणापुर येथुन सदर गुन्हयातील आरोपी नामे मुसेफ अब्दुल रहिम कुरेशी, वय १९ वर्षे, रा. सराई गल्ली बसवेश्वर चौक, रेणापुर ता, रेणापुर जि. लातुर यास ताब्यात घेवुन सदर आरोपीताकडुन सदर गुन्हयात चोरीस गेलेले १) टाटा आयसी कंपनीचे ४,५०,०००/-रुपये किंमतीचे व २) महेंद्रा कंपनीचे २,०००००/- रुपये किंमतीचे पिकअप जप्त केले आहे. असा ऐकणु ६,५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीतास मा. न्यायालयाने दिनांक २०/०७/२०२४ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे. सदरची कार्यवाही ही मा.श्री. नंदकुमार ठाकुर, पोलीस अधीक्षक, बीड, मा. श्रीमती. चेतना




तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहा. पोलीस अधीक्षक कमलेश मीना व पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन पोलीस स्टेशन केज यांचे आदेशान्वये पोउपनि राजेश पाटील, पोना/दिलीप गित्ते, पोह/उमेश आघाव, पोह/ बाळासाहेब अहंकारे, पोअं/ रशिद शेख, पोअं/संतोष गित्ते यांचे पथकाने केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077